# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक या संस्थेची पूर्वपीठीका

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही या महात्मा ज्योतिराव फुले यांच्या क्रांतिकारी विचाराने महाराष्ट्रातील बहुजन समाजात शिक्षणविषयक भान निर्माण केले. याच विचाराचा पाठपुरावा राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख आदी विचारवंत समाजसुधारकांनी अत्यंत तन्मयतेने केला. खेड्यापाडयात पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालये उघडल्याशिवाय व क्रमाने उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये काढल्याशिवाय शिक्षणाचा प्रकाश पोहचणार नाही ही धारणा या समाजधुरिणांची होती. त्यांच्या परंपरेचे पाईक होऊन कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर गणपतदादा मोरे, डी.आर. भोसले आदी कार्यकर्त्यांनी नाशिक जिल्ह्यातील शिक्षणप्रसाराच्या कार्याचा वसा घेतला. सन १९१४ साली उदोजी मराठा वसतिगृह स्थापन करून या महत्कार्याची मुहूर्तमेढ रोवली. सन १९१३ साली अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या नाशिक येथील अधिवेशनात धार संस्थानाचे राजे श्रीमंत उदोजीराव पवार यांनी रुपये १०,००० ची देणगी देऊन संस्थेचा पाया तर भक्कम केलाच पण संस्था सुस्थिर व्हावी हा दृष्टिकोन ठेवून रू. २,००० चे वार्षिक अनुदानही सुरू केले. तसेच राजर्षी शाहू महाराज यांनी रू. १५०००, श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी रू. १२०००, ग्वाल्हेर नरेश श्रीमंत माधवराव महाराज यांनी रू. १०,००० व उद्योजक पांडुरंग जावजी चौधरी प्रभृती यांनी रू. ३०००, अशा अनेक शिक्षणप्रेमी महानुभवांनी त्याकाळी देणग्या देऊन संस्थेच्या कार्यविस्तारास शुभेच्छा दिल्या.

'बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।' हे ब्रीद अंगीकारीलेल्या संस्थेच्या कार्यास मदतीचा हातभार लावण्यासाठी तत्कालीन सामाजिक कार्यकर्ते शंकरराव कदम कातरणीकर, विठ्ठलराव गाढवे, कीर्तिवानराव निंबाळकर, विठोबा पाटील कानळदकर, भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ, आण्णासाहेब मुरकुटे हे पुढे नावारूपास आली. अनेक ठिकाणच्या दानशूर व्यक्तींमुळे आणि शिक्षणप्रेमी सामाजिक कार्यकर्त्यामुळे संस्थेचे रोपटे बहरू लागले. संस्थेचा पुढे वटवृक्ष झाला. सन १९६४ साली संस्थेचे सुवर्ण महोत्सव, सन १९८९ साली अमृत महोत्सव साजरे झाले. सन २०१४ साली संस्थेचा शताब्दी महोत्सव साजरा झाला. संस्थेचे सभासद, संस्थेचा शाखाविस्तार, विद्यार्थी संख्या, सेवकसंख्या यांचा तपशील स्वतंत्रपणे दिलेला आहे. प्रगतीची ही मजल अक्षरश: थक्क करणारी आहे. यासाठी संस्थेचे आजी माजी पदाधिकारी आणि कार्यकारी मंडळीतील सदस्य यांचे योगदान मौलिक आहे.

संस्थेच्या या शैक्षणिक व सामाजिक जनसेवेबद्दल सन २००० साली महाराष्ट्र शासनाने राज्य पुरस्कार देऊन गौरविले आहे तर २००६ साली यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाने प्रवर्तित केलेला पंजाबराव देशमुख पुरस्कार देऊन संस्थेची प्रशंसा केली आहे.

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२.

## * संस्था दृष्टिक्षेपात *

| | |
|---|---|
| स्थापना | सन १९१४ |
| सार्वजनिक ट्रस्ट | रजि. नं. ए- ४३६/१९५४ |
| आजीव सभासद संख्या (जनरल) | १०,२११ |
| आजीव सभासद संख्या (सेवक) | ३७८ |
| शाखांची संख्या | ४८५ |
| विद्यार्थ्यांची संख्या | २१२५४३ |
| सेवक संख्या | ९३७४ |
| अंदाजपत्रक | सुमारे रु.६८७ कोटी ५६ लाख (२०१९-२०) |

## * शाखा विस्तार *

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्व प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ७४ | प्रिंटींग प्रेस | ०१ |
| पूर्व प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १६ | आय.टी.आय. | ०८ |
| प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ६९ | मेडिकल कॉलेज | ०१ |
| प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १५ | मेडिकल कॉलेज हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर | ०१ |
| आश्रमशाळा (प्राथमिक) | ०३ | विद्यार्थी वसतिगृहे | २४ |
| आश्रमशाळा (माध्यमिक) | ०२ | शेतकी शाळा | ०१ |
| माध्यमिक शाळा (मराठी माध्यम) | १५८ | ललितकला महाविद्यालय | ०१ |
| माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | ०५ | जनशिक्षण संस्थान | ०१ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | ६१ | पदविका फार्मसी महाविद्यालय (डी फार्म) | ०१ |
| अध्यापक विद्यालये | ०४ | परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय | ०१ |
| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ०१ | अभियांत्रिकी महाविद्यालय | ०१ |
| कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये | २२ | कृषी महाविद्यालय | ०१ |
| फार्मसी कॉलेज | ०१ | भौतिकोपचार महाविद्यालय | ०१ |
| आर्किटेक्चर कॉलेज | ०१ | विधी महाविद्यालय | ०१ |
| बॅचलर ऑफ डिझाईन | ०१ | कॉलेज ऑफ सोशल वर्क | ०१ |
| नर्सिंग कॉलेज | ०१ | पॉलिटेक्निक कॉलेज | ०१ |
| व्यवस्थापन संस्था (आय.एम.आर.टी.) | ०१ | नागरी आरोग्य केंद्र | ०१ |
| मविप्रचे प्रशिक्षण व विकास केंद्र | ०१ | ग्रामीण आरोग्य केंद्र | ०१ |
| मविप्र पीची फिप्सन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र | ०१ | **एकूण** | **४८५** |

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# कला आणि वाणिज्य महाविद्यालय, सोयगाव

ता. मालेगाव, जि. नाशिक – ४२३ २०३.

# * माहिती पत्रक *

## (वरिष्ठ महाविद्यालय)

### सन २०२० - २०२१

महात्मा ज्योतिबा फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्यासारख्या सामाजिक क्रांतीच्या अध्वर्यूपासून स्फूर्ती घेऊन कर्मवीर कै. रावसाहेब थोरात, कै. गणपतराव मोरे, कै. डी. आर. भोसले, कै. कीर्तीवानराव निंबाळकर इ. शिक्षणप्रेमींनी १९१४ मध्ये नाशिक येथे मराठा विद्या प्रसारक समाजाची स्थापना केली. या संस्थेच्या पुढील विकास कामात कै. काकासाहेब वाघ, कै. आण्णासाहेब मुरकुटे, कै. भाऊसाहेब हिरे यांच्यासारख्या असंख्य शिक्षणप्रेमींनी फार मोठे योगदान दिले आहे. समाजाने सुरूवातीच्या काळात महाराष्ट्रातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या जनतेस शिक्षित करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक कार्यास सुरूवात केली.

सर्वप्रथम उदोजी मराठा बोर्डिंग, नाशिक या संस्थेच्या स्थापनेने शैक्षणिक क्षेत्रात पदार्पण केले. आज समाजाने चालविलेल्या ४२२ शाखा असून त्यांच्यामार्फत ज्ञानदानाचे कार्य अतिशय जोरात सुरू आहे. सद्या २,०१,७९२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**महाविद्यालयासंबंधी थोडेसे**

जून २००३ मध्ये स्थापन झालेल्या आमच्या महाविद्यालयाचे चालू वर्षी पंधराव्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. या महाविद्यालयात प्रथम वर्ष कला व वाणिज्य, द्वितीय वर्ष कला व वाणिज्य, तृतीय वर्ष कला व वाणिज्य हे वर्ग सुरू आहेत. १ जून २०२० मध्ये बी.ए./बी.कॉम. ची पंधरावी तुकडी यशस्वीपणे बाहेर पडत आहे. या महाविद्यालयामुळे या परिसरातील ग्रामीण व शहरी विभागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची नवी संधी मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये

मालेगांव-सटाणा मार्गावर गिरणा नदी किनारी स्वतंत्र, भव्य, आकर्षक आणि हवेशीर वातावरणात संस्थेने घेतलेल्या जागेत महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे आणि नविन इमारतीत महाविद्यालयाचे स्थलांतर देखील झाले आहे.

**प्राध्यापक वर्ग :**

महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रात अनुभव असलेल्या आपापल्या विषयात तज्ज्ञ व पात्र असलेल्या आणि विद्यार्थी वर्गाबद्दल आस्था बाळगणारा असा उच्च विद्या-विभूषित, उत्साही आणि कार्यक्षम प्राध्यापक वर्ग महाविद्यालयास लाभला आहे.

**समृध्द ग्रंथालय :**

ग्रंथालय हा शैक्षणिक संस्थेचा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. या जाणिवेने महाविद्यालयाचे ग्रंथालय सर्व विषयातील पाठ्यपुस्तके व संदर्भग्रंथ यांनी समृध्द केले आहे. ग्रंथालयात तीन हजाराहून अधिक ग्रंथ आहेत. ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सोय करण्यात आली असून या ठिकाणी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक ती क्रमिक पुस्तके मिळू शकतात.

**पुस्तक पेढी :**

विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके साहाय्य करण्यासाठी पुस्तक पेढी उपलब्ध आहे. गरीब आणि अभ्यासू विद्यार्थ्यांना या पेढीतून वर्षभर पाठ्यपुस्तके मिळू शकतात. अशी पुस्तके मिळवण्यासाठी गरजू विद्यार्थ्यांनी ग्रंथपालाशी संपर्क साधणे आवश्यक असते.

**विद्यार्थी गुणगौरव समारंभ :**

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात विविध पातळ्यांवर विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. वेगवेगळ्या निमित्ताने स्पर्धा आयोजित केल्या जातात. विद्यार्थी गुणगौरव समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांना या सभारंभाच्या निमित्ताने निमंत्रित करण्यात आलेल्या प्रमुख अतिथींच्या हस्ते पारितोषिके देवून गौरविले जाते. या समारंभाचे स्वरूप कसे असावे या संबंधीचा अंतिम अधिकार माननीय प्राचार्यांचा राहील. विद्यार्थ्यांकडून या संदर्भात कोणतीही सूचना विचारात घेतली जाणार नाही.

**कलागुणांना वाव :**

विद्यार्थ्यांच्या वाङ्मयातील गुणांना वाव देण्यासाठी यावर्षी वार्षिक नियतकालिकाचा वार्षिक अंक **''मल्हार''** नावाने प्रसिध्द केला आहे. तसेच त्यांच्या विविध पातळ्यांवरील सर्जनशीलतेला व्यापक संधी देण्यासाठी भित्तीपत्रिका चालविली जातात. तसेच कलामंडळ, वादविवादमंडळ यांच्यामार्फत सातत्याने उपक्रम राबविले जातात.

**शारीरिक शिक्षण :**

विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाबरोबर त्यांच्या शारिरीक विकासाकडेही लक्ष देण्यात येते. विद्यार्थ्यांसाठी खास देशी-विदेशी खेळांची सोय करण्यात आली असून वेगवेगळ्या खेळांचे संघ तयार करून आंतरमहाविद्यालयीन सामन्यात भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. तसेच महाविद्यालयात सुसज्ज जिमखाना तयार करून आधुनिक खेळाचे साहित्य व जिम्स् उभारण्यात आलेले आहेत.

**एन.एस.एस. :**

२००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) चा उपक्रम चालू करण्यात आलेला आहे. समाजसेवेची व शारीरिक कष्टाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेत सामील होता येते. सदर योजनेच्या १५० विद्यार्थ्यांचे एकक कार्यरत आहे. व तसेच Self financed चे ५० विद्यार्थी एकक सुरू करण्यात आले आहे.

राष्ट्रीय योजनेत प्रौढ साक्षरता उपक्रमातही विद्यार्थ्यांना सहभाग घेता येतो.

**कमवा व शिका योजना :**

गरजू व होतकरू विद्यार्थ्यांस काम करून आपले शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीने या महाविद्यालयात कमवा व शिका ही योजना राबविली जाते. या योजनेमुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस फी, परीक्षा फी, एस. टी. सवलत इ. खर्च भागविता येतो.

**समर्थ भारत अभियान :**

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. वासुदेव गाडे यांच्या प्रेरणेने महाविद्यालयात समर्थ भारत अभियान सुरू करण्यात आले असून बेळगाव, ता. मालेगाव हे गाव दत्तक घेण्यात आले आहे. विद्यापीठाच्या मागदर्शक सूचनांप्रमाणे त्या गावात यशस्वीपणे उपक्रम राबविले जात आहेत.

**विद्यार्थी संसद मंडळ- निवडणुका :**

विद्यापीठ कायदा १९९४ नुसार महाविद्यालयात विद्यार्थी निवडणुका घेतल्या जात नाहीत. विद्यापीठ नियमाप्रमाणे व सूचनेप्रमाणे या संबंधी अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना राहील.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांची माहिती व्हावी. तसेच या स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठी सन २००६-२००७ मध्ये महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मागदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली. वर्षभरात होणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन महाविद्यालयात या केंद्रामार्फत केले जाते.

**पुणे विद्यापीठ - बहि:शाल शिक्षण मंडळ :**

पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ अंतर्गत महाविद्यालयात विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासाच्या दृष्टिने व्याख्यान मालेचे आयोजन केले जाते. या प्रामुख्याने तज्ज्ञ व्याख्यात्यांचे विविध विषयांवर व्याख्यान आयोजित केले जाते.

**महाविद्यालयीन वर्ष :**

२०२०-२०२१ शैक्षणिक वर्ष १५ जून २०२० पासून सुरू होईल. शैक्षणिक वर्ष दोन सत्रात विभागलेले राहील.

**आरोग्य प्रबोधन व व्याख्यानमाला :**

पुणे विद्यापीठाचा आरोग्य शिक्षण विभाग व महाविद्यालय यांच्या विद्यमाने आरोग्य विषयक जाणीव जागृती घडवून आणण्यासाठी आरोग्य प्रबोधन व्याख्यानमाला गुंफली जाते. ती सुरू करण्याचे दृष्टीने आम्ही प्रयत्नशील आहोत.

**डॉ. जयकर व्याख्यानमाला :**

पुणे विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. मुकुंदराव जयकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी पुणे विद्यापीठाच्या योजनेनुसार बॅ.जयकर स्मारक व्याख्यानमाला आयोजित केली जाते. ती सुरू करण्यात आली आहे.

**समाजदिन :**

नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे आद्य संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांच्या जयंतीदिनी समाजदिन साजरा केला जातो. या निमित्ताने निबंध वक्तृत्व, वादविवाद, सामान्यज्ञान परीक्षा अशा स्पर्धांचे आयोजन केले जाते.

**विशेष मागदर्शन योजना :**

पुणे विद्यापीठाच्या आर्थिक सहकार्याने खास अभ्यासात अप्रगत असलेल्या निवडक विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन योजना राबविली जाते. या योजनेत इंग्रजी व इतर विषयांच्या नामवंत प्राध्यापकांना निमंत्रित करून त्यांची अभ्यासपूर्ण व्याख्याने आयोजित केली जातात व विद्यार्थ्यांना लाभ मिळवून दिला जातो.

**Government of India B. C. Scholarship :**

मागासलेले वर्ग, वर्गीकृत जाती-जमाती यामधील विद्यार्थ्यांना दरमहा केंद्र सरकारकडून शिष्यवृत्ती मिळते. अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची फी सरकारकडून मिळते.

**विद्यार्थी मेडिक्लेम पॉलीसी :**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांची सुरक्षितता म्हणून रू. १७१/- मध्ये वैयक्तिक मेडिक्लेम पॉलीसी दिली जात आहे. या पॉलीसी अंतर्गत विद्यार्थ्यास संपूर्ण वर्षभरात रू. ५०,०००/- पर्यंत वैयक्तिक वैद्यकीय (आजारपण) खर्च घेता येईल. तसेच शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या वडिलांस अपघाती मृत्यू ओढवल्यास रू. २,००,०००/- पर्यंत विमा संरक्षण दिले जाणार आहे. सदर पॉलीसी ही विद्यार्थ्यास सक्तीची असणार नाही.

**प्रवेश मर्यादित :**

विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे प्रत्येक तुकडीस फक्त १२० विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा असल्याने सर्व पदवी वर्गात प्रवेश मर्यादित आहेत. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

## २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात
## दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची रूपरेषा

विद्यार्थी ज्या शाखेतून पास असेल त्याच शाखेमध्ये प्रवेश मिळेल.

पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासाठी फी आकारणी करण्यात येईल. दोन्ही शाखांसाठी पदवी परीक्षेकरीता विद्यापीठाने नियुक्त केलेल्या आणि महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाची व विषयांची माहिती पुढे दिली आहे. विषयांची निवड करतांना विद्यापीठाने विहीत केलेल्या विषय गटातून विद्यार्थ्यांना विषय निवडावे लागतील. याची सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

# - कला शाखा -

(Three years Integrated B.A. Degree Course)

कला शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येक वर्षी ६ विषय या प्रमाणे तीन वर्षात १८ पेपर्सचा अभ्यास करावा लागेल. पहिल्या वर्षी निवडलेल्या विषयांचा संबंध तिन्ही वर्षासाठी येत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी आरंभीच्या विषयांची निवड काळजीपूर्वक करावी.

**अ) एफ. वाय. बी.ए. परीक्षेसाठी विविध विषय समुह**

शै.वर्ष २०१९-२० पासून प्रथम वर्षासाठी (एफ.वाय.बी.ए.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

प्रथम वर्ष बी.ए. परीक्षेसाठी या महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या विषयांचे पुढीलप्रमाणे विषयसमुह पाडण्यात आले आहेत. एफ. वाय. बी. ए. वर्गासाठी घ्यावयाचे विषय पुढीलप्रमाणे आहेत. (एकूण ६ विषय):-

**एफ. वाय. बी. ए.**

ग्रुप : A इंग्रजी आवष्यक (Compulsory)

ग्रुप : B खालीलपैकी कोणतेही पाच विषय

मराठी
भूगोल
राज्यशास्त्र
सामान्य इंग्रजी
हिंदी
अर्थशास्त्र
इतिहास
मानसशास्त्र

**सूचना :**

१) इंग्रजी (ग्रुप : A) हा विषय प्रत्येक विद्यार्थ्याला घेणे आवश्यक आहे. राहिलेल्या ग्रुपमधून पाच विषय विद्यार्थ्याने निवडायचे आहेत.

२) अनिवार्य इंग्रजी व्यतिरीक्त इतर भाषांमधून कमीत कमी एक भाषा विषय घेणे आवश्यक आहे. अनिवार्य इंग्रजी शिवाय मराठी व हिंदी दोन्ही विषय विद्यार्थ्यांना घेता येतील. मात्र इंग्रजी (ऑप्शनल) विषय घेणाऱ्या विद्यार्थ्याला ग्रुप B (मराठी) व (हिंदी) मधुन कोणताही एक विषय घेता येईल. थोडक्यात सामान्य स्तरावर जास्तीत जास्त दोन भाषा विषय घेता येतील.

**एस.वाय.बी.ए.**

शै.वर्ष २०२०-२१ पासून द्वितीय वर्षासाठी (एफ.वाय.बी.ए.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

एस.वाय.बी.ए. च्या वर्गात प्रवेश घेतेवेळी एफ. वाय. बी.ए. मध्ये जे ५ विषय सामान्यस्तरावर घेतले असतील त्यातून एक विषय विशेष (स्पेशल) विषय म्हणून निवडता येईल. विद्यार्थ्यांनी इंग्रजी आवश्यक विषयाव्यतिरीक्त कोणतेही तीन विषय (सामान्य स्तर) निवडावेत. त्यापैकी एक स्पेशल असेल.

एस. वाय. व टी. वाय. बी. ए. साठी प्रवेशार्थीला खालील पत्रकात दर्शवल्याप्रमाणे अनिवार्य, सामान्य आणि विशेष स्तरावर असे एकूण ६ विषय निवडावे लागतील.

| **विषय** | **अनिवार्य** | **सामान्य** | **विशेष** |
|---|---|---|---|
| अ) इंग्रजी | १ | -- | -- |
| ब) जनरल विषय | -- | २ | -- |
| क) स्पेशल विषय | -- | १ | २ |
| **एकूण** | **१** | **३** | **२** |

या महाविद्यालयात १) इंग्रजी, २) मराठी, ३) भूगोल, ४) हिंदी, ५) अर्थशास्त्र, ६) इतिहास, ७) राज्यशास्त्र या स्पेशल विषयांचे अध्यापन केले जाते.

**टी. वाय. बी.ए.**

प्रत्येक विद्यार्थ्यास तृतीय वर्षासाठी सहा (६) पेपर्सचा अभ्यास करावा लागेल.

१) आवश्यक इंग्रजी (Compulsory English)

२) एस. वाय. बी. ए. मध्ये निवडलेल्या तीन सामान्य विषयांचे प्रत्येकी एक-एक याप्रमाणे तीन (३) पेपर्स

३) एस.वाय.बी.ए. ला घेतलेल्या स्पेशल विषयांचे दोन (२) पेपर्स.

# वाणिज्य शाखा

**(नवीन पुनर्रचित अभ्यासक्रम)**

**Three Year Integrated B. Com. Degree Course**

वाणिज्य शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला पहिल्या वर्षी (एफ.वाय.बी.कॉम.) सहा पेपर्स व एक भाषा पेपर, दुसऱ्या वर्षी (एस.वाय.बी.कॉम.) सहा पेपर्स आणि तिसऱ्या वर्षी (टी.वाय.बी.कॉम.) सहा पेपर्स असा एकूण १९ पेपर्सचा अभ्यास करावा लागतो. हा अभ्यास पुढीलप्रमाणे राहील.

## F.Y.B.Com.

शै.वर्ष २०१९-२० पासून प्रथम वर्षासाठी (एफ.वाय.बी.कॉम.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

A) Compulsory Group
   1) Functional English
   2) Financial Accounting
   3) Business Economics (Micro)

B) Optional Group (2 Papers)
   4) Mathematics & Statistics OR
   4) Computer concept & Programming.

C) Optional Group
   5) Commercial Geography OR
   5) Co-Operation
   5) Banking & Finance.

D) Optional Group
   6) Marketing & Salesmanship

E) Optionall Group
   7) Marathi OR
   7) Hindi

**S.Y.B.Com.**

शै.वर्ष २०२०-२१ पासून द्वितीय वर्षासाठी (एस.वाय.बी.कॉम.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

1) Principal and Function of Mangement
2) Corporate Accounting
3) Business Economics (Macro)
4) Business Communication
5) Company of Element Law

*** Optional Group**

6) Indian Banking System OR
6) Marketing Management OR
6) Cost & Works Accounting

**T.Y.B. Com.**

1) Business Regulatory Framework (M. Law)
2) Advanced Accounting
3) Indian & Globle Economic development
4) Auditing & Taxation

*** Special Paper - II**

5) Banking & Finance- II OR
5) Marketing Management- II
5) Cost & works Accounting

*** Special Paper- III**

6) Banking & Finance- III OR
6) Marketing Management-III

प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांनी कार्यालय प्रमुख व संबंधित विषयांचे विभागप्रमुख यांच्याशी प्रवेश पात्रतेच्या चौकशीसाठी संपर्क साधावा

## - प्रवेशासंबंधी महत्वाचे नियम -

परीक्षा विद्यापीठ नियमानुसार खालील विद्यार्थी प्रवेशास पात्र आहेत.

१) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या इ. १२ च्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले आसतील त्यांना प्रथम वर्षासाठी त्या-त्या शाखेत प्रवेश घेता येईल. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना १२ वी च्या परीक्षेची गुणपत्रिकेच्या दोन खऱ्या नकला, व मूळ दाखला प्रवेश अर्जासोबत जोडला पाहिजे. डी.एड्. परीक्षा इंग्रजी मेथडसह पास असणाऱ्या विद्यार्थ्यास प्रथम वर्ष

कला या वर्गात प्रवेश घेता येईल. (या बाबत विद्यापीठाचे वेळोवेळी येणारे आदेश बंधनकारक आहेत.) प्रवेश अर्जावर पालकांची सही आवश्यक आहे. जे विद्यार्थी महाविद्यालयात १२ वी नंतर प्रवेश घेतील त्यांना इलिजीबिलीटी फॉर्म भरणे बंधनकारक राहील. तसेच विद्यापीठाची योग्य ती फी भरणे बंधनकारक राहील.

२) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाखेरीज दुसऱ्या राज्यातील १२ वी किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असतील अशा विद्यार्थ्यांना पात्रता प्रमाणपत्रासाठी विहीत नमुन्यात अर्ज करावा लागेल. त्यासोबत योग्य ती फी भरावी लागेल.

३) प्रवेश अर्जातील सर्व माहिती विद्यार्थ्यांनी पूर्ण भरली पाहिजे. प्रवेश अर्जावर स्वत:चा पासपोर्ट आकाराचा नवीन फोटो चिटकवला पाहिजे. प्रवेशासंबंधीचा अंतिम अधिकार प्राचार्यांना राहिल.

४) प्रथम वर्ष कला, वाणिज्य या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाची मान्यता मिळाल्याशिवाय वार्षिक परीक्षेस बसता येणार नाही.

५) जे विद्यार्थी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेवू इच्छितात अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने नेमून दिलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून वैद्यकीय तपासणीचा दाखला महाविद्यालय सुरू झाल्यावर विहित मुदतीत सादर केला पाहिजे.

६) प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रासह पूर्ण भरून नेमून दिलेल्या लिपीकांकडून तपासून प्राचार्य यांची सही घेवून प्रवेश घ्यावा.

७) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर **मूळ दाखला परत मिळत नाही.** म्हणून सदर दाखला महाविद्यालयास देण्यापूर्वी त्याच्या आवश्यक जादा सत्यप्रती करून ठेवाव्यात.

८) विद्यापीठाकडून वेळोवेळी येणारी परिपत्रके व नियम विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

९) प्रवेश घेतल्यानंतर ताबडतोब ओळखपत्र घेणे

## शिस्तीसंबंधी आणि इतर आवश्यक सूचना-

१) दैनंदिन उपस्थिती, स्वाध्याय, अंतर्गत चाचण्यांना गैरहजर राहणारे आणि महाविद्यालयाला अपायकारक असे वर्तन करणारे विद्यार्थी यांना सत्र परीक्षेस बसू देण्याचा किंवा बसू न देण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

२) विद्यार्थ्याने महाविद्यालयाचा विहित फॉर्म भरून प्रवेश घेतला पाहिजे. महाविद्यालयातील वस्तूंची नासधूस करणे, महाविद्यालयाला अपायकारक असे वर्तन किंवा अशा हेतूसाठी इतरांना महाविद्यालयामध्ये आणणे, या गोष्टी गुन्हापात्र ठरतील. यासाठी पालकांची विहित ठिकाणी तशी स्वाक्षरी करावी.

३) प्रत्येक विद्यार्थ्यास महाविद्यालयामार्फत ओळखपत्र दिले जाईल. त्यावर पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवला पाहिजे. महाविद्यालयामध्ये प्राध्यापकांनी, अधिकाऱ्यांनी व प्रशासकीय सेवक यांनी मागणी करताच कोणतीही सबब न सांगता ओळखपत्र सादर केले पाहिजे.

४) कोणत्याही विद्यार्थ्यास सुरूवातीला एका सत्रात प्रवेश दिल्यानंतर त्या सत्रातील त्याचे वर्तन चांगले असेल तरच त्याला पुढील सत्रात प्रवेश दिला जाईल.

५) प्रत्येक वर्षी नव्याने प्रवेश घेतला पाहिजे.

६) **एकदा भरलेली फी कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.** विद्यार्थ्यांनी वेळोवेळी भरलेल्या फीच्या पावत्या संबंधीत लिपिकाकडून त्या दिवशी घ्याव्यात याबाबत काही अडचण असल्यास प्राचार्यांना त्वरीत भेटावे. अन्यथा फी बाबत विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.

७) विद्यार्थ्यांची उपस्थिती सरासरी ८०% असणे आवश्यक आहे.

८) महाविद्यालयाने सूचना फलकावर, वेळोवेळी लावलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा होणाऱ्या नुकसानीस तो विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

९) वर्ग चालू असतांना महाविद्यालयाच्या आवारात फिरणे किंवा अयोग्य वर्तन करणे या गोष्टी गुन्हापात्र ठरतील.

१०) महाविद्यालयाच्या आवारात रेडिओ, कॅमेरा व मोबाईल फोन आणू नयेत. वाहने महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या जागी ठेवावीत. महाविद्यालयीन वृत्त विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्यांच्या संमतीशिवाय प्रसिध्दीस देऊ नये.

११) पालकांच्या नावाखाली दुसऱ्यास महाविद्यालयामध्ये आणणे गुन्हा आहे.

१२) विद्यार्थ्यांचे एकंदर वर्तन वरील सुचनांचे विरोधी आढळून आल्यास **पुणे विद्यापीठ कायदा १९७४ यु.एस. ८७(४) आणि सी. (८) आणि पुणे विद्यापीठ क्र. १५३/८८ नुसार**प्राचार्य आपले अधिकार वापरू शकतात. त्या अधिकारानुसार एखाद्या विद्यार्थ्यास काढून टाकणे किंवा विशिष्ट कालावधीकरीता विशिष्ट अभ्यासक्रमास जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत बसू न देणे किंवा प्रतिबंध करणे किंवा त्याचा विशिष्ट परीक्षेचा निकाल रद्द करणे ही कार्यवाही केली जाऊ शकेल याची नोंद घ्यावी.

१३) या महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका होणार नाहीत. वरिष्ठ महाविद्यालयात गुणवत्तेनुसार विद्यार्थी प्रतिनिधीची नियुक्ती केली जाईल.

१४) कोणतेही कारण न देता कोणत्याही क्षणी प्रवेश देणे किंवा प्रवेश रद्द करणे प्राचार्यांच्या स्वाधीन राहील.

१५) कोणत्याही कारणास्तव शाखा बदल करता येणार नाही.

१६) विद्यार्थ्यांना किंवा विद्याथीनींना परस्पर वर्गात कोणीही भेटू नये, कार्यालयात अगोदर चौकशी करावी.

१७) कोणतेही व्यसन करणे किंवा वाईट सवयी गुन्हापात्र ठरतील.

१८) महाविद्यालयातून संबंधित विद्यार्थ्याने कागपत्र आवश्यक ती सर्टिफिकेटस् परीक्षा रिसिटस्, गुणपत्रक, एल.सी./टी.सी. इ. घेण्यासाठी प्रत्यक्ष विद्यार्थी ओळखपत्रासह उपस्थित असणे आवश्यक आहे. टी.सी.साठी ८ दिवस अगोदर अर्ज करावा.

१९) १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, समाजदिन व इतर सर्व कार्यक्रमांना हजर राहणे आवश्यक आहे. गैरहजर विद्यार्थ्यावर कडक कारवाई केली जाईल.

२०) सर्व प्रकारच्या मुळ दाखल्याच्या पुरेशा प्रती करून ठेवाव्यात व प्रवेश घेण्यापूर्वी Employment साठी नांव नोंदणी करून घ्यावी. एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव **दाखला किंवा मूळ कागदपत्रे परत मिळणार नाहीत. तसेच कुठल्याही प्रकारच्या छायांकित प्रती मिळणार नाहीत.**

२१) महाविद्यालयात स्नेहसंमेलन होणार नाही. परंतु गुणगौरव समारंभ घेतला जाईल.

२२) ड्युप्लीकेट दाखल्यासाठी मागणी करू नये. मूळ दाखला हरवला असेल किंवा चोरी गेला असेल तर त्यासाठी अगोदर कायदेशीररित्या पोलीसांत तक्रार करून महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

२३) विद्यापीठ व बोर्डाचे परीक्षा फॉमर्स भरल्यानंतर गैरवर्तन आढळल्यास किंवा प्राचार्यांना नियम नं. १२ नुसार कोणत्याही कारणास्तव परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

२४) सर्व प्रकारची फी परीक्षा सुरू होण्याअगोदर भरावी, अन्यथा परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

**भविष्यकालीन योजना :**

१) मुक्त विद्यापीठ केंद्र सुरू करणे : उच्च शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर गेलेले ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र सुरू करून अशा विद्यार्थ्यांना प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सुरू करण्याचा प्रयत्न आहे.

२) एन्. सी. सी. (राष्ट्रीय छात्र सेना): विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षणाची माहिती व आवड निर्माण व्हावी यासाठी महाविद्यालयात एन्.सी.सी. सुरू करण्याचा मानस आहे.

३) संगणक कोर्सेस : विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाप्रमाणेच संगणकाचे ज्ञान मिळावे म्हणून महाविद्यालयात छोटे कोर्सेस सुरू करून विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देण्याचा मानस आहे.

**❖ महाविद्यालयाची वेळ ❖**

**महाविद्यालयाची वेळ :** सकाळी-७.३० ते १.०० वा. पर्यंत राहील
**कार्यालयीन कामकाजाची वेळ :** सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वा.

❖ **टिप :** सन २०१७-१८ या वर्षी संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आलेले आहे. जून २०२० पासून कनिष्ठ महाविद्यालयाचे चौथे वर्ष सुरू होत आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

❖❖❖

**डॉ. एच.एम. क्षिरसागर**
प्राचार्य

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोयगाव

ता. मालेगाव, जि. नाशिक – ४२३ २०३.

## * माहिती पत्रक *

## (कनिष्ठ महाविद्यालय)

### सन २०२० - २०२१

**कनिष्ठ महाविद्यालयाविषयी**

कला, वाणिज्य व विज्ञान या ज्ञानशाखांमध्ये पारंपरिक पदवी शिक्षण देणारे महाविद्यालय म्हणून या महाविद्यालयाची स्थापना २००३ साली झाली. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाची सुरुवात शै. वर्ष २०१७–१८ पासून स्वयं अर्थसहाय्य तत्वावर सुरू करण्यास शासनाकडून परवानगी मिळाली आहे. सुरुवातीच्या काळात २०१६ पर्यंत हे महाविद्यालय भाडे तत्वावर असलेल्या इमारतीत सुरू करण्यात आले होते. आता हे महाविद्यालय संस्था मालकीच्या सुसज्ज इमारतीत भरविले जात आहे. त्याचबरोबर हे महाविद्यालय गिरणा नदीच्या तीरावर वसलेले असून अतिशय निसर्गरम्य वातावरण ह्या महाविद्यालयास लाभलेले आहे. हे महाविद्यालय सोयगाव परिसरात एक विकसनशील व सर्व सोयींनी सुसज्ज असलेले महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. मातृसंस्था व महाविद्यालय यांचे बोधवाक्य एकच आहे. बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

वरील बोधवाक्य लक्षात ठेवून हे महाविद्यालय सोयगाव तथा मालेगाव शहर व परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीने उच्च शिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. महाविद्यालयाची स्वत:ची प्रशस्त इमारत असून विज्ञान शाखेच्या स्वतंत्र प्रयोगशाळा व स्वतंत्र ग्रंथालय आहे.

सन २०१९–२० मध्ये कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल १००% लागला असून ही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद बाब आहे.

**महाविद्यालयाचे ध्येय व उद्दिष्टे**

खालील उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी महाविद्यालय बांधील आहे.

* ग्रामीण भागातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या व पददलित जनतेला गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण देणे व त्यांना मुख्य सामाजिक प्रवाहात आणणे.

* सामाजिक बांधिलकी असलेला जबाबदार व संवेदनशील तरूणवर्ग निर्माण करणे.
* समाजाची परिपूर्ण जाणीव होण्यासाठी तरूण वर्गाचा दृष्टीकोन विशाल बनविणे.
* आधुनिक तंत्रज्ञानाशी स्वत:चे समायोजन करून देशाचे हित व विकासासाठी धडपडणारे व आधुनिक दृष्टीकोन, भविष्याचा वेध घेणारे, मनुष्यबळ निर्माण करणे.
* भारतीय संविधानाने पुरस्कृत केलेली मुल्ये रूजविणे.

**ध्येय**

म.वि.प्र. संस्थेची धोरणे व कार्यक्रम राबविणे.

**विद्यार्थ्यांच्या संदर्भातील उद्दिष्ट्ये**

* समाजाभिमुख शिक्षण देणे.
* त्यांच्या कार्याचे नियमितपणे परीक्षण व मूल्यमापन करणे.
* वादविवाद तसेच काव्यवाचन, अभिनय, केशरचना, मेहंदीरचना, निबंध स्पर्धा, वक्तृत्व, गीत, नृत्य, शब्दसंपदा इ. सारख्या सांस्कृतिक स्पर्धां मध्ये सहभागी होण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.
* विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करणे.
* वनस्पतीशास्त्र, भुगोल, रसायनशास्त्र,भौतिकशास्त्र इ. विषयांत शैक्षणिक सहली आयोजित करणे.
* आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत सामाजिक व ग्रामीण गरजांची पूर्तता करण्यासाठी ज्ञान व कौशल्ये संक्रमित करणे.
* शिस्त, दृढनिश्चय, निष्ठा समर्पणवृध्दी यांची वाढ करणे.
* स्वाभिमान, प्रतिष्ठा व सामाजिक बांधीलकी यांची जाणीव वृध्दींगत करणे.

# प्रवेश / अर्हता

**इ. ११ वी : एस.एस.सी. (दहावी उत्तीर्ण) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष परीक्षा इंग्रजी या विषयासह उत्तीर्ण**

**इ. १२ वी : महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त महाविद्यालयातून अकरावी परीक्षा उत्तीर्ण अथवा मान्यताप्राप्त समकक्ष परीक्षा उत्तीर्ण**

**विज्ञान शाखेसाठी एस.एस.सी. परीक्षेत विज्ञान विषयात किमान ४०% गुण आवश्यक**

## प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रे

**महाविद्यालयाचा प्रवेश अर्ज भरतांना सोबत**

**१) इयत्ता १०वी/इयत्ता ११वी गुणपत्रकांच्या दोन झेरॉक्सप्रती.**

**२) शाळा सोडल्याचा मुळ दाखला व दोन झेरॉक्स प्रती (महाविद्यालयामार्फत साक्षांकित केलेल्या असाव्या.)**

**३) दोन अद्यावत पासपोर्ट साईज फोटो.**

**४) महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी** (Migration) **मायग्रेशन सर्टिफिकेट**

**५) जातीचा दाखला-दोन झेरॉक्स प्रती.** (SC,ST, NT, DT, VJ, SBC, OBC, etc.)

६) विद्यार्थी सुरक्षा फॉर्म

७) जिल्हा बदल/बोर्ड बदल असल्यास तसा दाखला (नियमानुसार आवश्यक कागदपत्रे पुर्तता करावी लागेल.)

८) आधार कार्ड १ झेरॉक्स प्रत

९) रेशन कार्ड १ झेरॉक्स प्रत

१०) नाशिक जिल्हा बाहेरील विद्यार्थ्यांनी दाखल्याच्या मागे जिल्हाशिक्षणाधिकारींची सही शिक्का आणावा.

## उपस्थिती नियमावली

अ) महाविद्यालयाचे २०२०-२०२१ चे शैक्षणिक वर्ष १५ जून २०२० पासून सुरू होईल. विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवसापासून प्रत्येक तासिकेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष हे दोन सत्रात विभागलेले असते. दिवाळीची सुट्टी (ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२०) संपल्यानंतर दुसरे सत्र सुरू होईल.

ब) परीक्षेला पात्र ठरण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांची किमान ८५ टक्के हजेरी आवश्यक आहे. आजार किंवा अन्य कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास प्राचार्यांना कळविणे आवश्यक आहे.

क) वर्गाचे तास, स्वाध्याय, चाचण्या, प्रात्यक्षिके व परीक्षा यांना नियमित उपस्थित राहणे आवश्यक आहे.

ड) विद्यार्थ्यांचे विविध खेळांचा स्पर्धांमध्ये सहभाग घेणे आवश्यक आहे.

## अभ्यासक्रम

विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतांना विचारपूर्वक विषय निवडावे. नंतर विद्यार्थ्यांना कोणत्याही कारणास्तव विषय बदलता येणार नाही.

**कला शाखा :**

(विद्यार्थ्यास एकूण सात विषय घ्यावे लागतील)

सक्तीचे विषय: अ) इंग्रजी ब) मराठी / हिंदी
क) पर्यावरण शास्त्र ड) शारीरिक शिक्षण

**वैकल्पीक विषय:** खालीलपैकी चार विषय

अ) अर्थशास्त्र/सहकार ब)राज्यशास्त्र क) भूगोल इ) इतिहास

## वाणिज्य शाखा

(विद्यार्थ्यास एकूण सात विषय घ्यावे लागतील)

**सक्तीचे विषय:** अ) इंग्रजी ब) मराठी / हिंदी

क) पर्यावरण शास्त्र ड) शारीरिक शिक्षण

**वैकल्पीक विषय** : खालीलपैकी कोणतेही चार विषय

अ) अर्थशास्त्र ब) पुस्तकपालन व लेखाकर्म

क) वाणिज्य संघटन ड) चिटणीसाचा व्यवसाय ई) सहकार

## विज्ञान शाखा

(विद्यार्थ्यास एकूण सात विषय घ्यावे लागतील)

**सक्तीचे विषय:** अ) इंग्रजी

ब) मराठी / हिंदी / माहिती तंत्रज्ञान (गुणवत्तेनुसार)

क) भौतीकशास्त्र

ड) रसायनशास्त्र इ) पर्यावरण शास्त्र ई) शारीरिक शिक्षण

**वैकल्पीक विषय :** खालीलपैकी कोणतेही दोन विषय

अ) गणित

ब) जीवशास्त्र

क) भूगोल (मर्यादित प्रवेश - गुणवत्तेनुसार)

**टीप** : १) एस.एस.सी.परीक्षेतील गुणांच्या आधारे केलेल्या गुणवत्ता यादीनुसार ११ वी विज्ञान वर्गात प्रवेश मिळेल.

२) इ. १२ वी सायन्सला विद्यार्थी इंजिनिअरींग व मेडिकल ग्रुप विषय दोन्हीही घेवू शकतो, किंवा कोणताही एकच ग्रुप ठेवून फक्त गणित विषयाऐवजी भूगोल विषय घेवू शकतो.

# परीक्षा

❋ ११वी- कला, वाणिज्य व विज्ञान

परीक्षा: (Examination) ११वी वर्गातील विद्यार्थ्यांना वर्षभरातून पुढील परीक्षा अनिवार्य आहेत.

१) स्वाध्याय

२) घटक चाचणी

३) तोंडी परीक्षा

४) प्रकल्प

५) प्रथम सत्र परीक्षा

६) द्वितीय सत्र परीक्षा

७) प्रात्यक्षिके

### ❊ १२वी- कला, वाणिज्य व विज्ञान

अ) प्रत्येक विषयाची २० मार्कांची तोंडी परीक्षा असेल.

ब) प्रत्येक विषयाची २५ मार्कांची प्रथम सत्र व द्वितीय सत्र १ घटक चाचणी घेतली जाते. तसचे सहामाही परीक्षा ५० गुणांची व वार्षिक ८० व तोंडी २० गुणांची अशी एकूण २०० मार्कांच्या सरासरीने निकाल ठरविला जातो.

क) बारावी : बारावी परीक्षा महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळामार्फत घेतली जाते. तसेच महाविद्यालयातर्फे वर्षभरात स्वाध्याय व घटक चाचण्या, प्रात्यक्षिके आणि पूर्वपरीक्षा घेतली जाईल. या सर्व परीक्षांना विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

ड) म.वि.प्र. पध्दती : विज्ञान शाखेसाठी १९९३-९४ पासून म.वि.प्र. पध्दती सुरू करण्यात आली आहे. इ. १२ वी च्या वार्षिक परीक्षेच्या दृष्टीने जास्तीत जास्त तयारी करून घेतली जाते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत त्यामुळे वाढ झाली आहे.

**माध्यम :**

| | | |
|---|---|---|
| कला शाखा | : | मराठी माध्यम |
| वाणिज्य शाखा | : | मराठी माध्यम |
| विज्ञान शाखा | : | इंग्रजी माध्यम |

**कनिष्ठ महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी (२०१९-२०) :**

**१२ वी विज्ञान शाखेत प्रथम तीन गुणवंत विद्यार्थी**

| | | |
|---|---|---|
| १) पवार सृष्टी विनोद | - ८२.९२% | प्रथम |
| २) बच्छाव प्रसाद निंबा | - ८२.३१% | द्वितीय |
| ३) राऊत निलेश राजु | - ८२.००% | तृतीय |

**१२ वी वाणिज्य शाखेत प्रथम तीन गुणवंत विद्यार्थी**

| | | |
|---|---|---|
| १) मोर लोकेश शंभुदयाल | - ८५.३८% | प्रथम |
| १) मुनोत ललितकुमार चंदुलाल | - ८५.३८% | प्रथम |
| २) पटेल उमा अरविंद | - ८४.३१% | द्वितीय |
| ३) दुधोडिया चैतन्य हेमंत | - ८२.४६% | तृतीय |

**❖ कनिष्ठ महाविद्यालयाची वेळ ❖**

**कनिष्ठ महाविद्यालयाची वेळ :** सकाळी-११.३० ते ४.३० वा. पर्यंत राहील
**कार्यालयीन कामकाजाची वेळ :** सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वा.

**डॉ. एच.एम. क्षिरसागर**
प्राचार्य

मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# कला व वाणिज्य महाविद्यालय, सोयगाव

प्राचार्य

## डॉ. एच.एम. क्षिरसागर

(एम.ए.,बी.एड., एम.फिल, पीएच.डी)

### * प्राध्यापक वृंद *

| | |
|---|---|
| **१) डॉ. मनोज विठ्ठल जगताप** | सहा. प्राध्यापक (उपप्राचार्य) |
| **२) प्रा. बाबाजी मोतीराम आहिरे** | सहा. प्राध्यापक |
| **३) प्रा. श्रीमती संगिता मुरलीधर आहिरे** | सहा. प्राध्यापक |
| **४) प्रा. जयंत दगा पवार** | सहा. प्राध्यापक |
| **५) प्रा.डॉ. श्रीमती वृषाली मधुकर देसाई** | सहा. प्राध्यापक |
| **६) प्रा. पिराजी दत्ता गोणारकर** | सहा. प्राध्यापक |
| **७) प्रा. निलेश भगवान नेरकर** | सहा. प्राध्यापक |
| **८) प्रा. रामेश्वर नारायण सोनवणे** | सहा. प्राध्यापक |
| **९) प्रा. अविनाश मधुकर पगार** | सहा. प्राध्यापक |
| **१०) प्रा. लहू किसन मुठे** | सहा. प्राध्यापक |
| **११) प्रा. श्रीमती मिनाक्षी बबन काळे** | सहा. प्राध्यापक |
| **१२) प्रा. चंद्रशेखर आण्णासाहेब मोरे** | क्रीडा संचालक |
| **१३) प्रा. केतन रमेश देवरे** | ग्रंथपाल |
| **१४) प्रा. गोरखराज सुरेश गांगुर्डे** | सहा. प्राध्यापक (कनिष्ठ विभाग प्रमुख) |
| **१५) प्रा. योगेश अशोकराव कोते** | सहा. प्राध्यापक (कनिष्ठ विभाग) |
| **१६) प्रा. नितीन भालचंद्र शेवाळे** | सहा. प्राध्यापक (कनिष्ठ विभाग) |
| **१७) प्रा. विलास युवराज शिरसाठ** | सहा. प्राध्यापक (कनिष्ठ विभाग) |
| **१८) प्रा. गणेश बळीराम शेवाळे** | सहा. प्राध्यापक (कनिष्ठ विभाग) |
| **१९) प्रा. संदिप भास्कर गायकवाड** | सहा. प्राध्यापक (कनिष्ठ विभाग) |
| **२०) प्रा. युवराज रविंद्र ठाकरे** | सहा. प्राध्यापक (कनिष्ठ विभाग) |
| **२१) प्रा. विजय बापू आहिरराव** | सहा. प्राध्यापक (कनिष्ठ विभाग) |
| **२२) प्रा. सौ. शितल साहेबराव पाटील** | सहा. प्राध्यापक (कनिष्ठ विभाग) |

## ✻ प्रशासकीय सेवक ✻

| | |
|---|---|
| **१) श्री. सचिन शिवमन शिंदे** | कार्यालयीन अधिक्षक |
| **२) श्री. निलेश सुदाम पाटील** | कनिष्ठ लिपीक |
| **३) श्री. सागर अशोक मोरे** | कनिष्ठ लिपीक |
| **४) श्री. पठाडे अरुण किसनराव** | ग्रंथालय लिपीक |
| **५) श्री. भरत कारभारी पाटील** | प्रयोगशाळा साहाय्यक |
| **६) श्री. विलास दादाजी पवार** | शिपाई |
| **७) श्री. भाऊसाहेब कारभारी बच्छाव** | शिपाई |
| **८) श्री. पवार युवराज बाळासाहेब** | शिपाई |
| **९) श्री. सुर्यवंशी प्रतिक बापु** | शिपाई |
| **९) श्री. सोनवणे शंतनु लक्ष्मण** | शिपाई |
| **१०) श्री. शालीग्राम कौतीक देवरे** | शिपाई |
| **११) श्री. रोशन शिवाजी निकम** | शिपाई |
| **१४) श्री. पायमोडे अजय नारायण** | ड्रायव्हर |
| **१३) श्री. खंडु लाला बोरसे** | वॉचमन |

✻✻✻

# पुणे विद्यापीठ गीत


<u>ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान</u>

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हें पवित्र तीर्थ मानतों
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्त्वपरीक्षा
हें विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान



## समाजगीत

जनकल्याणी देह झिजवूनी लाजविले चंदना
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना
तुम्हाला लाख लाख वंदना ।।धृ.।।
ऋषिराजाने राजर्षीने लावियली ज्योत
वसा ज्योतीचा घेऊनी साचा पेटविला पोत
दिशादिशांतून घराघरांतून आली नवजाग
दिसू लागला मनामनातला मुक्तीचा मार्ग
निद्रेतच होते दंग
अंतरातले स्फुलिंग
ते उठले उधळीत रंग
बहुजन हिताय, बहुजन सुखाय चेतविली चेतना
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।१।।
नांगर टाका, भाला फेका शिकवी शिवराया
त्याच मातीवर कसुनी कंबर करूया नव किमया
निरलस श्रमुनी काढू खणूनी रूतलेली शल्ये
निष्ठा शिंपून करू पेरणी हवी नवी मूल्ये
दृढनिश्चय ऐसा करूनी
कार्यात प्राण ओतुनी
आयुष्य दिले झोकुनी
ज्ञानप्रशाला उभारण्याला दिलीत हो प्रेरणा
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।२।।
मूक अडाणी फुलवू अग्रणी त्यातूनी ही जिद्द
मुळात अबला करू या सबला धन्य धन्य ब्रीद
दिव्य थोरवी कुठली ओवी गुंफावी गौरवा
नम्रपणाने एक मागणे हट्ट हाच पुरवा
निरपेक्ष अपुली कृती
ती सेवाभावी मती
ती निष्ठा तसली धृती
समाजदिन हा सार्थ कराया द्या हो द्या प्रेरणा
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।३।।

**– कै. प्रा. श्रीरंग गुणे**

## ⁎ पर्यावरण प्रतिज्ञा ⁎

- माझ्या भोवतालच्या परिसर माझा आहे.
- परिसरातील सारे पर्यावरण माझे आहे.
- पर्यावरण स्वच्छ, सुंदर व मंगल राखणाऱ्या निसर्गावर माझे प्रेम आहे.
- माझ्या परिसरातील समृध्द आणि विविधतेने नटलेल्या निसर्गाचा मला अभिमान आहे.
- पर्यावरणाचा समतोल राखणाऱ्या निसर्गाचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
- मी माझ्या परिसराच्या, गावाच्या आणि देशाच्या पर्यावरणाचा तोल राखणाऱ्या निसर्गाचा मान ठेवीन आणि त्याची काळजी घेईन.
- माझा परिसर आणि परिसरातील पर्यावरण यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.
- परिसर आणि पर्यावरणाचा तोल राखणाऱ्या निसर्गाचा आणि नैसर्गिक जीवनाचा विकास आणि समृध्दी ह्यातच माझे सौख्य सामावलेले आहे.

SAVE WATER & ELECTRICITY